**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२५-२६/सामायिक प्रवेश परिक्षा निकाल/ दिनांक- २२/०९/२०२५

# सुचना

## एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५-निकाल प्रसिध्द करणे बाबत

सन २०२५-२६ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा पार पडली असून लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिनांक.१८.०८.२०२५ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०८.०९.२०२५ ते १५.०९.२०२५ या कालावधीत मुलाखत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मुलाखत प्रक्रिया पार पडली असून लेखी व मुलाखत यांचे एकत्रित गुणांनुसार निकाल प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर निकाल विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर यादी राज्यगुणवत्ता यादी प्रवेशासाठी निश्चित करण्यात आली आहे. सदर गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना रिक्त जागा व आरक्षणानुसार निवडलेल्या संस्थेत गुणानुक्रमानुसार प्रवेश दिला जाणार आहे.

**विद्यार्थ्यांनी दिनांक २२.०९.२०२५ ते २६.०९.२०२५ रोजी रात्री १२.०० पर्यत प्रशिक्षण संस्था निवड करण्याबाबतचा पसंतीक्रम अर्ज (Preference Form) प्रोफाईल लॉगीन वरून भरुन देण्यात यावा**. दिनांक २६.०९.२०२५ नंतर कोणत्याही परिस्थितीत सदर मुदत वाढविली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी व पुढील सुचनांसाठी वेळोवेळी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.siac.org.in चे अवलोकन करावे.

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**